# प्रकरण-III

# वित्तीय व्यवस्थापन

# प्रकरण III

# वित्तीय व्यवस्थापन

## 3. वित्तीय व्यवस्थापन

जेजेएम हा एक कालबद्ध मिशन मोड कार्यक्रम आहे आणि त्याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी भक्कम आर्थिक नियोजन, वेळेवर निधीपुरवठा, पुरेशा संसाधनांची उभारणी आणि निधीचा विवेकपूर्ण वापर या पूर्व-अटी आहेत. निधीपुरवठा आणि त्यावरील खर्चासंबंधीचे लेखापरीक्षण निरीक्षण खाली तपशीलवार दिले आहे.

## 3.1 जल जीवन अभियान निधीतील केंद्र आणि राज्य वाट्याच्या वितरणास विलंब

2019-20 साठीचा जेजेएम निधीचा केंद्र आणि राज्याचा वाटा डब्ल्युएसएसडीद्वारे अंमलबजावणी संस्थाना वितरित करण्यात आला. 2021-22 मध्ये, निधी हस्तांतरणासाठी सार्वजनिक वित्त व्यवस्थापन प्रणालीचे (पीएफएमएस) एसएनए मॉड्यूल लागू करण्यात आले. जेजेएम निधीच्या मार्गदर्शक तत्वांच्या परिच्छेद 7.8 नुसार, अतिरिक्त सुरुवातीची शिल्लक रक्कम समाविष्ट केल्यानंतर पहिल्या हप्त्याचा पहिला हप्त्या एप्रिल महिन्यात वितरित केला जाईल. पहिल्या हप्त्याच्या दुसऱ्या हप्त्याचे वितरण त्याच्या वापरावर अवलंबून असेल. दुसऱ्या हप्त्याच्या वितरणासाठी, राज्याने सादर करावयाची कागदपत्रे म्हणजेच, चालू वर्षाचे तात्पुरते उपयोगिता प्रमाणपत्र (यूसी), मागील वर्षाचे लेखापरीक्षित लेखे विवरण (एएसए) आणि मागील वर्षाची अंतिम केंद्र व राज्य उपयोगिता प्रमाणपत्रे, यांच्या आधारे आर्थिक प्रगतीचे मूल्यांकन केले जाईल.

एसडब्ल्युएसएम ने दिलेल्या माहितीनुसार, 2019-24 या कालावधीत ₹ 59,740.99 कोटींच्या अनुज्ञेय वाटपापैकी, केंद्र आणि राज्याला मिळालेल्या हप्त्यांची/टप्प्यांची एकूण रक्कम ₹ 27,657.56 कोटी[9] म्हणजेच 46.30 *टक्के* होती. केंद्र आणि राज्य वाट्याच्या वितरणाचा तपशील **तक्ता 3** मध्ये दिला आहे.

---

[9] ₹ 27657.56 कोटी ही रक्कम, युसी (तक्ता 2 आणि 4) नुसार निधी वितरणात दाखवलेल्या ₹ 27559.26 कोटी रकमेसोबत जुळत नाही. विभागाने सांगितले की, हे वर्षादरम्यान मिळालेले मागील वर्षाचे अनुदान, मार्गातील निधी आणि राज्य स्तरावरील नियमित कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी एसएनए खात्यातील ₹ 23.35 कोटींच्या निधीमुळे झाले आहे.

**तक्ता 3: वर्षादरम्यान वितरित केलेल्या निधीचा तपशील**

***(₹ कोटी मध्ये)***

| वर्ष | केंद्र/राज्य वाटा | केंद्राकडून महाराष्ट्राला देय असलेले एकूण वाटप / राज्याचा सममूल्य वाटा# | पहिल्या हप्त्याचे वितरण | | दुसऱ्या हप्त्याचे वितरण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पहिला टप्पा | दुसरा टप्पा | पहिला टप्पा | दुसरा टप्पा |
| 2019-20 | केंद्र | 847.97 | 369.76* | निरंक | निरंक | निरंक |
| | राज्य | 324.15 | 355.19 | निरंक | निरंक | निरंक |
| | एकूण | 1,172.12 | 724.95 | निरंक | निरंक | निरंक |
| 2020-21 | केंद्र | 1,828.92 | 471.92* | निरंक | निरंक | निरंक |
| | राज्य | 450.38 | 466.21* | निरंक | निरंक | निरंक |
| | एकूण | 2,279.30 | 938.13 | निरंक | निरंक | निरंक |
| 2021-22 | केंद्र | 7,064.41 | 1,666.64 | निरंक | निरंक | निरंक |
| | राज्य | 1,747.62 | 1747.62 | निरंक | निरंक | निरंक |
| | एकूण | 8,812.03 | 3,414.26 | निरंक | निरंक | निरंक |
| 2022-23 | केंद्र | 7,600.00 | 1,957.81 | 1,957.81 | निरंक | निरंक |
| | राज्य | 2,746.58 | 1,912.13 | 1,912.13 | निरंक | निरंक |
| | एकूण | 10,346.58 | 3,869.94 | 3,869.94 | निरंक | निरंक |
| 2023-24 | केंद्र | 21,465.88 | 1,861.07 | 1,861.07 | 1,861.07 | 1,861.07 |
| | राज्य | 15,665.08 | 1943.14* | 1,817.64 | 1,817.64 | 1,817.64 |
| | एकूण | 37,130.96 | 3,804.21 | 3,678.71 | 3,678.71 | 3,678.71 |
| **एकुन बेरिज** | | **59,740.99** | **12751.49** | **7,548.65** | **3,678.71** | **3,678.71** |

*स्रोत: एसडब्ल्युएसएमने दिलेली माहिती *मागील वर्षाच्या अनुदानाचा[10] समावेश आहे*

*# अनुज्ञेय वाटपासंबंधीची माहिती एसडब्ल्युएसएमने तयार केली आहे, तथापि, या गणनेचा आधार लेखापरीक्षणाला कळवण्यात आलेला नाही.*

**तक्ता 3** वरून खालील गोष्टी दिसून येतात:

1.पाचही वर्षांमध्ये मिळून महाराष्ट्राला ₹ 59,740.99 कोटी देय होते, परंतु एकूण वितरित रक्कम (केंद्र + राज्य, सर्व टप्पे) केवळ ₹ 27,657.56 कोटी होती, म्हणजेच अनुज्ञेय वाटपाच्या सुमारे 46.30 *टक्के* हे केवळ निधीच्या समस्येकडे नव्हे, तर प्रणालीगत वापर/अंमलबजावणीतील अडथळ्यांकडे निर्देश करते. एवढी मोठी तफावत केवळ प्रक्रियात्मक विलंबाने स्पष्ट करता येत नाही.

2. उच्च देयता असूनही, पहिल्या तीन वर्षांत (2019-20 ते 2021-22) निधीचे वितरण कमी झाले. यावरून हे स्पष्टपणे दिसून येते की, हप्ता मिळवण्यासाठी युसी आणि एएसए सादर करण्याच्या पूर्वशर्तींची पूर्तता करण्यात असमर्थता होती.

10 संबंधित वर्षांमध्ये मिळालेले मागील वर्षाचे अनुदान 2019-20 मध्ये ₹ 24.48 कोटी (केंद्र वाटा), 2020-21 मध्ये ₹ 14.69 कोटी (केंद्र वाटा) आणि ₹ 15.83 कोटी (राज्य वाटा) आणि 2023-24 मध्ये ₹ 125.49 कोटी (राज्य वाटा) आहे.

प्रत्येक आर्थिक वर्षाचे अंतिम युसी आणि एएसए, आर्थिक वर्ष संपल्यापासून सहा महिन्यांच्या आत भारत सरकारकडे सादर करणे आवश्यक होते. तथापि, 2019-20 ते 2023-24 या वर्षांसाठीचे युसी तीन ते 14 महिन्यांच्या विलंबाने सादर करण्यात आले. त्याचप्रमाणे, **परिच्छेद 3.7** मध्ये चर्चा केल्याप्रमाणे, 2019-20 ते 2023-24 या वर्षांसाठीचे एएसए देखील तीन ते 14 महिन्यांच्या विलंबाने सादर करण्यात आले. त्यामुळे, जेजेएम निधीच्या हप्त्याच्या वितरणासाठीची युसी आणि एएसए वेळेवर सादर करणे हि पूर्वशर्त पूर्ण करण्यास विलंब झाला.

3. वरील तक्त्यावरून हे देखील दिसून येते की, 2023-24 मध्ये अनुज्ञेय वाटपात (₹ 37,130.96 कोटी) अचानक वाढ झाली, ज्यामध्ये केंद्राचा अनुज्ञेय वाटा ₹ 21,465.88 कोटी आणि राज्याचा अनुज्ञेय वाटा ₹ 15,665.08 कोटी होता. तथापि, केंद्र आणि राज्य या दोघांनी मिळून दोन हप्त्यांच्या एकूण चार टप्प्यांमध्ये अंदाजे समान रक्कम (₹ 14,840 कोटी) वितरित केली, जी अनुज्ञेय रकमेच्या 39.96 *टक्के* होती.

त्याच्या प्रमाणात वितरण न होता वाटपात झालेली प्रचंड वाढ हे दर्शवते की, योजनेच्या कालावधीसाठी म्हणजेच 2019-24 साठीची योजना प्रभावीपणे तयार केली गेली नाही, ज्यामुळे जेजेएमची अंमलबजावणी असमान झाली. हे या वस्तुस्थितीवरून स्पष्ट होते की, 2019-24 मध्ये हाती घेतलेल्या एकूण डब्ल्युएसएसपैकी, 75 *टक्के* डब्ल्युएसएस केवळ 2021-23 मध्येच हाती घेण्यात आल्या. हे नियोजन आणि अंमलबजावणी क्षमतेमधील ताळमेळाच्या अभावाचे द्योतक आहे.

शिवाय, मंजूर वाटपाच्या तुलनेत सातत्याने कमी निधीचे वितरण, हे नियोजन सज्जता आणि अंमलबजावणी क्षमतेमधील महत्त्वपूर्ण उणिवा दर्शवते, ज्यामुळे राज्यात जेजेएमच्या अंमलबजावणीच्या गतीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने हे मान्य केले की 2019-20 ते 2021-22 या कालावधीत, पुढील हप्ता/टप्पा मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या खर्चाची अट पूर्ण होऊ न शकल्यामुळे उर्वरित हप्ते/टप्पे प्राप्त झाले नाहीत.

## 3.2 निधी प्रवाह तसेच झालेला खर्च

2019-24 या आर्थिक वर्षात ₹ 27,559.26 कोटींचा निधी (केंद्र आणि राज्याचा वाटा) प्राप्त झाला आणि या कालावधीत ₹ 26,410.51 कोटींचा खर्च झाला, जसे की **तक्ता 4** मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**तक्ता 4: प्राप्त निधी आणि झालेल्या खर्चाचा तपशील**

| वर्ष | केंद्र आणि राज्य वाटा प्राप्ती | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र | राज्य | एकूण | केंद्र | राज्य | एकूण |
| 2019-20 | 369.76 | 355.19 | 724.95 | 352.11 | 468.44 | 820.55 |
| 2020-21 | 471.92 | 446.33 | 918.25 | 537.11 | 429.52 | 966.63 |
| 2021-22 | 1680.55 | 1757.46 | 3438.01 | 540.69 | 470.64 | 1011.33 |
| 2022-23 | 3915.62 | 3847.61 | 7763.23 | 3251.30 | 3076.35 | 6327.65 |
| 2023-24 | 7444.26 | 7270.56 | 14714.82 | 8629.43 | 8654.92 | 17284.35 |
| **एकूण** | **13882.11** | **13677.15** | **27559.26** | **13310.64** | **13099.87** | **26410.51** |


*स्रोत: एसडब्ल्युएसएमने दिलेली माहिती*

वरील तक्त्यात केवळ 2022-23 पासूनची महत्त्वपूर्ण प्राप्ती आणि खर्च दर्शविला आहे, ज्यात 2023-24 मध्ये मोठी वाढ दिसून येते. यावरून राज्यात जेजेएमच्या कार्यान्वयनास विलंब झाल्याचे दिसून येते, याचा अर्थ असा की सुरुवातीची वर्षे मोठ्या प्रमाणावर तयारी किंवा प्रक्रियात्मक विलंबात गेली आणि अंमलबजावणीचा कालावधी प्रभावीपणे कमी झाला, ज्यामुळे 2024 च्या उद्दिष्टांना धक्का बसला.

निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये अंतर्गत उपक्रमांना (जिल्हा परिषद/एमजेपी/ जीएसडीए) मिळालेल्या निधीची आणि त्यांनी केलेल्या खर्चाची स्थिती **तक्ता 4** मध्ये दिली आहे. असे दिसून आले की, निवडलेल्या जिल्ह्यांच्या स्तरावर, अंतर्गत उपक्रम 2019-24 दरम्यान वाटप केलेल्या निधीचा वापर करू शकले नाहीत.

**तक्ता 4: निधीची प्राप्ती आणि झालेला खर्च (2019-24)**

***(₹ कोटींमध्ये)***




*स्रोत: अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांनी दिलेली माहिती*

1. **तक्ता 4** मध्ये सर्व वर्षांमधील खर्च हा प्रत्यक्ष प्राप्तीचे प्रतीबिंब दर्शवतो. यावरून हे सिद्ध झाले की निधीची उपलब्धता ही मुख्य अडचण होती. असे दिसते की ही केवळ खर्चाच्या कार्यक्षमतेची समस्या नसून, निधी प्रवाहातील एक अडथळा आहे.

2. **तक्ता 4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2023-24 मध्ये प्राप्ती आणि खर्च दोन्ही वाढले असले तरी, अभियानाच्या कालावधीच्या तुलनेत हे खूप उशिरा झाले, जे अकार्यक्षम अंमलबजावणी पद्धती दर्शवते. यामुळे मूळ कालमर्यादेत मोठ्या प्रमाणावर शाश्वत घरगुती नळजोडणी साध्य करण्याची विश्वासार्हता सुनिश्चित करता आली नाही.

3. कमी प्राप्तीमुळे खर्चावर मर्यादा आल्या, ज्यामुळे प्रत्यक्ष प्रगती कमी झाली. **परिच्छेद 4.1.2** मध्ये चर्चा केल्याप्रमाणे, मार्च 2024 पर्यंत केवळ 24.64 *टक्के* योजना पूर्ण झाल्या होत्या.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025) शासनाने सांगितले की, केंद्राकडून मिळालेले अनुदान आणि स्वतःचा वाटा, निधी एसएनए मध्ये जमा होताच त्यांनी अंमलबजावणी संस्थांना वितरित केला.

तथापि, निधी वितरणास झालेल्या विलंबामुळे जेजेएमच्या प्रगतीवर परिणाम झाला, ही वस्तुस्थिती होती.

## 3.3 अखर्चीत रकमेवर मिळालेले व्याज जमा करण्यास विलंब

जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांच्या परिच्छेद 7.9 मध्ये अशी तरतूद आहे की, व्याज म्हणून जमा होणारी रक्कम त्याच खात्यात जमा केली जावी आणि संबंधित वर्षाच्या युसी मध्ये दर्शविली जावी. सामान्य वित्तीय नियम 2017 च्या नियम 230 (8) मध्ये अशी तरतूद आहे की, कोणत्याही अनुदानप्राप्त संस्थेला दिलेल्या अनुदानावर किंवा आगाऊ रकमांवर मिळणारे सर्व व्याज किंवा इतर उत्पन्न, हिशेब अंतिम झाल्यानंतर तात्काळ भारताच्या एकत्रित निधीमध्ये अनिवार्यपणे जमा केले जावे. अशा आगाऊ रकमा भविष्यातील वितरणांमधून समायोजित करण्याची परवानगी दिली जाऊ नये. वित्त मंत्रालयाने (भारत सरकार) (जुलै 2022) निर्देश दिले की, राज्यातील प्रत्येक केंद्र पुरस्कृत योजनेच्या (सीएसएस) एसएनएने मागील आर्थिक वर्षात (केंद्र आणि राज्य शासन या दोन्हींकडून) आपल्या खात्यात मिळालेल्या निधीतून मिळवलेल्या एकूण व्याजाची गणना एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात करावी आणि ती रक्कम संबंधित एकत्रित निधीमध्ये जमा करावी. भारत सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाच्या पेयजल व स्वच्छता विभागाने (मार्च 2022) डब्ल्युएसएसडीला कळवले की, जेजेएम अंतर्गत वितरित केलेल्या केंद्र निधीवर आर्थिक वर्ष 2021-22 साठी मिळवलेल्या व्याजाची रक्कम 05 एप्रिल 2022 पर्यंत जमा करायची होती.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, राष्ट्रीय जल जीवन अभियानाने (एनजेजेएम) केंद्र हिश्श्यावरील व्याज जमा करण्यासाठी (मार्च 2022) (म्हणजेच एनटीआरपी पोर्टल/डीडी/चेकद्वारे पीएओ, पेयजल व स्वच्छता विभाग, नवी दिल्ली यांना) विहित पद्धती ठरवल्या होत्या. व्याज जमा करण्याशी संबंधित नोंदींच्या छाननीदरम्यान असे आढळून आले की, ***परिशिष्ट III*** मध्ये तपशीलवार नमूद केल्यानुसार, आर्थिक वर्ष 2020-21 ते 2023-24 साठी केंद्रीय हिश्श्यावरील ₹ 110.00 कोटी व्याज जमा करण्यास 11 दिवस ते 452 दिवसांचा विलंब झाला होता.

2020-21 ते 2023-24 या कालावधीत राज्य हिश्श्यावर मिळालेले ₹ 110.00 कोटींचे व्याज 23 ऑगस्ट 2023 ते 04 जुलै 2024 दरम्यान राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा करण्यात आले, ज्यामुळे 26 ते 677 दिवसांचा विलंब झाला. योग्य लेखा शीर्ष उपलब्ध नसल्यामुळे व्याज जमा होऊ शकले नाही, ज्यासाठी (जून 2023) मध्ये आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या.

निर्गमन बैठकीमध्ये, शासनाने (डिसेंबर 2025) सांगितले की, पीएफएमएसमधील समस्यांचे निराकरण केल्यानंतर, 2022-23 या वर्षासाठी मिळवलेले व्याज जुलै

2024 मध्ये भारताच्या एकत्रित निधीमध्ये हस्तांतरित करण्यात आले. डब्ल्युएसएसडीकडून सूचना (जून 2023) निर्गमित झाल्यानंतरच राज्य हिश्श्यावरील व्याज जमा करण्यात आले.

## 3.4 अमान्य खर्च

जेजेएमच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, कार्यालयीन/निवासी इमारतीचे ओ&एम, बांधकाम/नूतनीकरण/दुरुस्ती, पाणी पुरवठा कामांशी संबंधित वीज बिलांचे भुगतान इत्यादींवरील कोणताही खर्च जेजेएम निधीतून अनुज्ञेय असणार नाही, असे नमूद केले होते.

लेखापरीक्षणात अनुज्ञेय नसलेल्या खर्चाची खालील उदाहरणे आढळून आली:

### 3.4.1 जेजेएम निधीतून सीवर जेम सॉफ्टवेअरची खरेदी

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, डब्ल्युएसएसडीने 36 सॉफ्टवेअरच्या खरेदीला मंजुरी दिली होती, ज्यामध्ये एमजेपीद्वारे जेजेएम आणि स्वच्छ भारत अभियाना (एसबीएम) अंतर्गत अनुक्रमे पाणी पुरवठा आणि सांडपाणी व्यवस्थेसाठी सहाय्यक प्रणाली म्हणून वापरल्या जाणाऱ्या 17 वॉटर जेम्स[11] आणि 19 सीवर जेम्स[12] सॉफ्टवेअरचा समावेश होता. एमजेपीने (डिसेंबर 2022) नागपूर येथील सेन्सिस टेक लिमिटेडकडून अनुक्रमे ₹ 6.01 कोटी आणि ₹ 6.02 कोटी दराने 20 बेंटले वॉटर जेम्स आणि 16 बेंटले सीवर जेम्स खरेदी केले. ही खरेदी एमजेपी, ठाणे मार्फत करण्यात आली.

बेंटले सीवर जेम्स सॉफ्टवेअर सिस्टीम ही एसबीएमसाठी सांडपाणी व्यवस्था व्यवस्थापित करण्यासाठी वापरली जाणार असल्याने आणि तिचा डब्ल्युएसएसशी काहीही संबंध नसल्याने, जेजेएम सहाय्यक उपक्रम निधीतून त्यावर झालेला ₹ 6.02 कोटींचा खर्च अस्वीकार्य होता.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025) शासनाने सांगितले की जेजेएम मार्गदर्शक तत्त्वे जेजेएम प्रकल्पासाठी उपयुक्त असलेल्या सॉफ्टवेअरच्या खरेदीस मनाई करत नाहीत, त्यामुळे, अभियान संचालक, एसडब्ल्युएसएम यांनी सॉफ्टवेअर खरेदीस मंजुरी दिली.

---

11 भौगोलिक परिस्थितीनुसार पाणी पुरवठा योजनांची रचना करताना, योजनेच्या कामात वापरायच्या पाईपची रुंदी आणि जाडी निश्चित करण्यासाठी वॉटर जेम्स सॉफ्टवेअर मदत करते.

12 सीवर जेम्स सॉफ्टवेअर भौगोलिक परिस्थितीनुसार भूमिगत सांडपाणी योजनेची संकल्पना तयार करण्यास, तसेच सांडपाणी व्यवस्थापनात वापरल्या जाणाऱ्या पाईप्सची रुंदी आणि जाडी निश्चित करण्यास मदत करते.

उत्तर स्वीकार्य नाही कारण सॉफ्टवेअर खरेदीवर खर्च करण्यात आला आहे, जो जेजेएमच्या कोणत्याही उद्दिष्टांची पूर्तता करत नाही.

### 3.4.2 निवासी क्वार्टर्सच्या बांधकामावरील अस्वीकार्य खर्च

अहिल्यानगरच्या राहुरी आणि रहाटा तालुक्यांमध्ये, ब्राह्मणी बहुग्राम योजना आणि लोणी बुद्रुक व खुर्द योजनेच्या पाणी पुरवठा योजनांच्या कामांतर्गत कर्मचाऱ्यांसाठी तीन निवासी क्वार्टर्सच्या बांधकामाची तरतूद करण्यात आली होती. या क्वार्टर्ससाठी अंदाजित खर्च ₹ 47.12 लाख होता, ज्यापैकी ₹ 8.71 लाख अदा करण्यात आले, ज्यामुळे या निवासी क्वार्टर्सवर ₹ 38.41 लाखांचे दायित्व निर्माण झाले, जे जेजेएम अंतर्गत स्वीकार्य नव्हते. प्रत्यक्ष पाहणीदरम्यान, **छायाचित्र 3** मध्ये दाखवल्याप्रमाणे, निवासी क्वार्टर्सचे बांधकाम पूर्णत्वाच्या टप्प्यात असल्याचे आढळून आले.




**छायाचित्र 3: लोणी बुद्रुक, जिल्हा अहिल्यानगर येथे निवासी क्वार्टर**

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की अंमलबजावणी संस्थाना जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याच्या सूचना निर्गमित केल्या जातील.

### 3.4.3 वीज बिलांप्रति अमान्य भरणा

एमजेपी, ठाणे आणि एमजेपी, जळगाव यांनी 11[13] डब्ल्युएसएसशी संबंधित वीज बिलांवर ₹ 1.13 कोटींची रक्कम भरली, जी जेजेएम निधी योजनेअंतर्गत स्वीकार्य नव्हती. कार्य.अभि., एमजेपी, ठाणे आणि कार्य.अभि., एमजेपी, जळगाव

[13] जळगाव जिल्ह्यातील नशिराबाद, करोडा, पिंपळनेर, पालधी, शिरसोली, असोजा डब्ल्युएसएस आणि 31 गावे डब्ल्युएसएस आणि ठाणे जिल्ह्यातील वांगणी, बडाफोकर, कसारा, आणि वांगणी आणि बडाफोकर डब्ल्युएसएस.

यांनी (सप्टेंबर 2024 आणि ऑक्टोबर 2024 मध्ये) उत्तर दिले की, सुरुवातीला या योजना एनआरडीडब्ल्युपी अंतर्गत होत्या आणि नंतर त्या जेजेएममध्ये विलीन करण्यात आल्या. तसेच, एनआरडीडब्ल्युपी अंतर्गत वीज बिल भरण्याची तरतूद असल्याने, तीच प्रक्रिया पुढे चालू ठेवण्यात आली.

तथापि, निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025) शासनाने सांगितले की या संदर्भात संबंधितांना आवश्यक सूचना निर्गमित केल्या जातील.

## 3.5 जल जीवन अभियान अंमलबजावणीच्या खर्चात लक्षणीय वाढ

राज्यात जेजेएमच्या अंमलबजावणीसाठी सुरुवातीचा अंदाजित (सप्टेंबर 2020) खर्च ₹ 13,668.50 कोटी होता. तथापि, 2023-24 पर्यंत, जेजेएमच्या अंमलबजावणीसाठी ₹ 27,559.26 कोटींची रक्कम आधीच मंजूर करण्यात आली होती. मार्च 2024 पर्यंत राज्याने ₹ 26,410.51 कोटी खर्च केले होते, तरीही, ***परिच्छेद 4.1*** मध्ये चर्चा केल्यानुसार, 146.81 लाख घरांपैकी 21.80 लाख घरांना अद्याप कार्यान्वित नळजोडणी द्यायची होती. पुढे, ***परिच्छेद 4.1.2*** मध्ये चर्चा केल्यानुसार, प्रत्येक ग्रामीण घराला पाणी पुरवठा करण्यासाठी हाती घेतलेल्या डब्ल्युएसएसपैकी 75.36 *टक्के* (51,560 डब्ल्युएसएस पैकी 38,857 डब्ल्युएसएस) प्रकल्प मार्च 2024 पर्यंत पूर्ण होणे बाकी होते. त्यामुळे, प्रलंबित नळजोडणी आणि डब्ल्युएसएसच्या कामामुळे जेजेएम अंमलबजावणीच्या खर्चात आणखी वाढ होईल. मार्च 2024 पर्यंतच, जेजेएम अंमलबजावणीचा खर्च अंदाजित खर्चाच्या (सप्टेंबर 2020) तुलनेत दुप्पट झाला आणि प्रलंबित कामांमुळे तो आणखी वाढणार आहे.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025), शासनाने सांगितले की, त्यांनी कोविड काळात प्रति व्यक्ती निकषांवर आधारित आणि सविस्तर सर्वेक्षण व अंदाजाशिवाय अंदाजे ₹ 13,668.50 कोटीचा जीआर (सप्टेंबर 2020) निर्गमित केला होता. अंमलबजावणीच्या खर्चातील वाढ ही त्यानंतरच्या वर्षांमध्ये म्हणजेच 2021-22 आणि 2022-23 मध्ये केलेल्या सविस्तर सर्वेक्षण आणि अंदाजामुळे झाली. याशिवाय, दरसूचीत वाढ; योजनेच्या अंदाजित आयुर्मानासाठी योजनेच्या रचना निकषांमध्ये 15 वर्षांवरून 30 वर्षांपर्यंत बदल; जेजेएमच्या अंदाजात एफएचटीसी खर्चाचा समावेश आणि त्यावेळी जीएसटीचा दर 12 टक्क्यांवरून 18 टक्क्यांपर्यंत वाढवणे, या सर्वांचा एकूण खर्चावर परिणाम झाला.

वस्तुस्थिती हि होती की, सुरुवातीच्या टप्प्यातील अंदाजे मूल्यांकन आणि डब्ल्युएसएस हाती घेण्यास झालेल्या विलंबामुळे नंतरच्या टप्प्यात अंमलबजावणीच्या खर्चात लक्षणीय वाढ झाली. शिवाय, जेजेएम मार्गदर्शक

तत्त्वांनुसार प्रकल्पाचे अंतिम आयुष्य 30 वर्षे असणे आवश्यक होते, तथापि, शासनाने हा निकष केवळ डिसेंबर 2021 मध्येच स्वीकारला (महा. शासन जीआर दिनांक 08 डिसेंबर 2021).

## 3.6 योजनांच्या किंमतीत केलेली सुधारणा

राज्यात, 51,560 डब्ल्युएसएसपैकी 13,835 योजनांच्या खर्चात ₹ 9,608.87 कोटींची वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे जसे **तक्ता 5** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 5: योजनांच्या खर्चाची सुधारणा**

*(₹ कोटी मध्ये)*

| अंमलबजावणी करणारी संस्था (1) | अंमलबजावणी अंतर्गत असलेल्या डब्ल्युएसएस ची एकूण संख्या (2) | सुधारणेसाठी प्रस्तावित डब्ल्युएसएस ची एकूण संख्या (3) | सुधारणेसाठी प्रस्तावित डब्ल्युएसएस चा अंदाजित खर्च (4) | डब्ल्युएसएसची सुधारित किंमत (5) | खर्चात वाढ (6=5-4) |
|---|---|---|---|---|---|
| एमजेपी | 929 | 581 | 17032.42 | 21022.58 | 3990.16 |
| झेडपी | 50631 | 13254 | 12168.40 | 17787.11 | 5618.71 |
| **एकूण** | **51560** | **13835** | **29200.82** | **38809.69** | **9608.87** |

*स्रोत: विभागाने दिलेली माहिती*

**तक्ता 6** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, निवडक सहा जिल्ह्यांमध्ये 2,976 डब्ल्युएसएस सुधारित करण्याचा प्रस्ताव होता (एमजेपीशी संबंधित 290 डब्ल्युएसएस आणि झेडपीशी संबंधित 2,686 डब्ल्युएसएस).

**तक्ता 6: निवडलेल्या जिल्ह्यांमधील डब्ल्युएसएसच्या खर्चातील सुधारणा**

*(₹ कोटी मध्ये)*

| जिल्ह्याचे नाव | अंमलबजावणी करणारी संस्था | कार्यान्वित केलेल्या डब्ल्युएसएस ची एकूण संख्या | सुधारणेसाठी प्रस्तावित डब्ल्युएसएस ची संख्या | मूळ अंदाजानुसार डब्ल्युएसएस च्या खर्चात प्रस्तावित केलेली सुधारणा आहे. | सुधारित अंदाजानुसार डब्ल्युएसएस चा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| अहिल्यानगर | एमजेपी | 112 | 88 | 3076.01 | 3889.28 |
| | झेडपी | 830 | 555 | 886.12 | 1440.69 |
| जळगाव | एमजेपी | 26 | 18 | 522.83 | 504.92 |
| | झेडपी | 1275 | 543 | 539.11 | 608.11 |

| जिल्ह्याचे नाव | अंमलबजावणी करणारी संस्था | कार्यान्वित केलेल्या डब्ल्युएस एस ची एकूण संख्या | सुधारणेसाठी प्रस्तावित डब्ल्युएसएस ची संख्या | मूळ अंदाजानुसार डब्ल्युएसएस च्या खर्चात प्रस्तावित केलेली सुधारणा आहे. | सुधारित अंदाजानुसार डब्ल्युएसए स चा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| कोल्हापूर | एमजेपी | 15 | 11 | 540.60 | 652.19 |
| | झेडपी | 1270 | 512 | 604.16 | 919.22 |
| पुणे | एमजेपी | 168 | 142 | 3802.67 | 5010.77 |
| | झेडपी | 2170 | 788 | 1247.73 | 2044.14 |
| सोलापूर | एमजेपी | 23 | 16 | 378.39 | 456.01 |
| | झेडपी | 1099 | 128 | 131.46 | 237.57 |
| ठाणे | एमजेपी | 22 | 15 | 525.18 | 678.86 |
| | झेडपी | 720 | 160 | 140.13 | 200.15 |
| **एकूण** | | **7730** | **2976** | **12394.39** | **16641.91** |
| दर्शवलेली सुधारित अंदाजाची रक्कम केवळ प्रस्ताव आहे, खर्च अजून व्हायचा होता. | | | | | |

*स्रोत: विभागाने दिलेली माहिती*

**तक्ता 5 आणि 6 वरून** असे दिसून येते की, राज्य स्तरावर 27 *टक्के* आणि निवडक जिल्ह्यांमधील 38 *टक्के* डब्ल्युएसएस खर्च पुनरावलोकनाच्या प्रक्रियेखाली होता. अतिरिक्त वस्त्यांसाठी कामाच्या व्याप्तीत वाढ, पाण्याच्या स्रोतात/जमिनीत बदल, अतिरिक्त कामांची अंमलबजावणी, निविदा दरापेक्षा जास्त दराने कामाचे वाटप इत्यादी कारणांमुळे खर्चात सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. निवडक जिल्ह्यांमध्ये आढळलेल्या प्रकरणांची चर्चा खालीलप्रमाणे आहे:

**निवडक जिल्ह्यांमध्ये निदर्शनास आलेली प्रकरणे**

- कार्य.अभि. एमजेपी-1, पुणे यांच्या अंतर्गत शिरूर तालुक्यामधील हिवरे एकल गाव योजनेचे (एसव्हीएस) काम 4140 अंदाजित लोकसंख्येसाठी तांत्रिकदृष्ट्या मंजूर (नोव्हेंबर 2022) करण्यात आले होते. तथापि, सुधारित अंदाजामध्ये, अंदाजित लोकसंख्या 6343 पर्यंत वाढवण्यात आली, ज्यामुळे खर्च ₹ 5.10 कोटींवरून ₹ 25.52 कोटींपर्यंत वाढला. यावरून असे दिसून येते की योग्य सर्वेक्षण आणि अंदाजपत्रक तयार केले गेले नव्हते.
- कार्य.अभि. एमजेपी-1, पुणे यांनी पाटस एसव्हीएस चे काम ₹ 22.56 कोटी किमतीवर (जानेवारी 2023) प्रदान केले होते. जून 2023 मध्ये, ग्रामपंचायतीने अंदाजपत्रकाचे काम पुरेशे नसुन त्यांना माहिती न

देता केले गेल्याचे सांगून अतिरिक्त साठवण टाकीची मागणी केली. त्यामुळे, ₹ 38.41 कोटींचे सुधारित अंदाजपत्रक (ऑगस्ट 2024) प्रस्तावित करण्यात आले.

- एमजेपी संगमनेर अंतर्गत येणाऱ्या जावळे बालेश्वर आणि 10 गावांमधील डब्ल्युएसएसच्या कामाचा सुरुवातीचा खर्च ₹ 65.53 कोटींवरून ₹ 89.03 कोटींपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव होता. ही खर्चवाढ अतिरिक्त वस्तीचा समावेश झाल्यामुळे वितरण जाळ्यात 1.5 किलोमीटरची वाढ आणि वन विभागाकडून एनओसी मिळण्यास विलंब झाल्यामुळे जमिनीमध्ये झालेल्या बदलामुळे झाली. कार्य.अभि., एमजेपी, संगमनेर यांनी (ऑक्टोबर 2024 मध्ये) सांगितले की, ज्या वस्त्यांमध्ये आधीपासूनच पाईपलाईन होत्या, त्यांना वगळण्यात आले होते, परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणीदरम्यान असे लक्षात आले की त्या पाईपलाईन वापरासाठी योग्य नाहीत.
- संगमनेर तालुक्यामधील निमोन आणि इतर चार गावांकरिता कार्य.अभि. एमजेपी, संगमनेर द्वारे बहु-ग्रामीय डब्ल्युएसएस नुतनीकरण करुन कार्यान्वित करण्यात आले. डब्ल्युएसएसचे काम मार्च 2024 मध्ये पूर्ण होऊन कार्यान्वित झाले. तथापि, कार्य.अभि. यांनी राहिलेल्या वस्त्यांना समाविष्ट करण्यासाठी डब्ल्युएसएसकरिता सहा अतिरिक्त ईएसआर आणि 20 किमीच्या वितरण नेटवर्कचे बांधकाम जोडून (सप्टेंबर 2024) योजनेत सुधारणा (₹ 11.25 कोटींवरून ₹ 15.48 कोटी) करण्याचा प्रस्ताव दिला.

त्यामुळे, अयोग्य सर्वेक्षणाने केवळ अंदाजातच बदल झाला नाही, तर वगळलेल्या वस्त्यांना मिळणारे लाभ मिळण्यासही विलंब झाला.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025) शासनाने सांगितले की एनजेजेएमने डिसेंबर 2022 अखेरपर्यंत कार्यारंभ आदेश निर्गमित करण्याची अंतिम मुदत दिली होती, ज्यामुळे उपलब्ध मर्यादित मनुष्यबळाला डिसेंबर 2022 पूर्वी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्याचे मोठे काम पार पाडण्यास भाग पडले. पुढे असेही सांगण्यात आले की, खर्चातील प्रस्तावित बदल हा वगळलेल्या वस्त्या, जमिनीचे प्रश्न आणि डब्ल्युएसएसमधील तांत्रिक बदलांमुळे होता.

मर्यादित मनुष्यबळासंदर्भात शासनाने दिलेले उत्तर स्वीकार्य नाही, कारण अभियंत्यांची कमतरता भरून काढण्यासाठी शासनाने राज्यात पाच पीएमसी नियुक्त केल्या होत्या आणि डीपीआरच्या समन्वयासाठी, त्रयस्थ पक्ष तपासणी (टीपीआय) एजन्सींच्या देखरेख व मूल्यांकनासाठी आणि आयएमआयएसमधील

माहिती अद्ययावत करण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळाला परवानगी दिली होती. मनुष्यबळ उपलब्ध करूनही, नियोजनात त्रुटी होत्या आणि अपुऱ्या सर्वेक्षण/ अंदाजांमुळे योजनांच्या खर्चात सुधारणा करावी लागली.

## 3.7 लेख्यांचे लेखापरीक्षण आणि उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यास विलंब

जेजेएम मार्गदर्शक तत्त्वांच्या परिच्छेद 7.16 मध्ये असे नमूद केले आहे की, एसडब्ल्युएसएम हे सुनिश्चित करेल की आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत सनदी लेखापालाद्वारे (सीए) लेख्यांचे लेखापरीक्षण केले जाईल आणि यूसी व एएसए भारत सरकारकडे वेळेवर सादर केले जातील.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, **तक्ता 7** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 2019-20 ते 2023-24 या वर्षांसाठी एएसए तयार करण्यास तीन ते 14 महिन्यांचा विलंब झाला होता.

**तक्ता 7: एएसए तयार करण्यास झालेला विलंब**

| वर्ष | सरकारला युसी पाठवण्याची अंतिम मुदत | एएसए तयार आणि तपासणी झाल्याची तारीख | महिन्यांत विलंब |
|---|---|---|---|
| 2019-20 | 30 सप्टेंबर 2020 | 21 नोव्हेंबर 2021 | 14 |
| 2020-21 | 30 सप्टेंबर 2021 | 24 ऑक्टोबर 2022 | 13 |
| 2021-22 | 30 सप्टेंबर 2022 | 28 जून 2023 | 9 |
| 2022-23 | 30 सप्टेंबर 2023 | 02 जानेवारी 2024 | 3 |
| 2023-24 | 30 सप्टेंबर 2024 | 07 जुलै 2025 | 9 |

*स्रोत: एसडब्ल्युएसएमने दिलेली माहिती.*

शिवाय, **तक्ता 8** मध्ये दाखवल्याप्रमाणे यूसी तीन ते 14 महिन्यांच्या विलंबाने सादर करण्यात आले.

**तक्ता 8: यूसी सादर करण्यास झालेला विलंब**

| वर्ष | सरकारला यूसी पाठवण्याची अंतिम मुदत | यूसी पाठवण्याची तारीख | विलंब (महिन्यांमध्ये) |
|---|---|---|---|
| 2019-20 | 30 सप्टेंबर 2020 | 30 नोव्हेंबर 2021 | 14 |
| 2020-21 | 30 सप्टेंबर 2021 | 10 मार्च 2022 | 5 |
| 2021-22 | 30 सप्टेंबर 2022 | 11 जुलै 2023 | 9 |
| 2022-23 | 30 सप्टेंबर 2023 | 07 फेब्रुवारी 2024 | 4 |
| 2023-24 | 30 सप्टेंबर 2024 | 07 जुलै 2025 | 9 |

*स्रोत: एसडब्ल्युएसएमने दिलेली माहिती.*

एसडब्ल्युएसएमने सांगितले की, झेडपी/एमजेपी आणि जीएसडीए कडून लेखापरीक्षण अहवाल उशिरा मिळाल्यामुळे, 2021-22 मध्ये पीएफएमएस

मॉड्यूलची अंमलबजावणी आणि 2022-23 मध्ये सीएच्या नियुक्तीस झालेल्या विलंबामुळे हा विलंब झाला. एसडब्ल्युएसएमच्या उत्तरावरून असे दिसून येते की, एएसए आणि यूसी वेळेवर पूर्ण करणे आणि सादर करण्यावर देखरेख अपुरी होती.

निर्गमन बैठकीमध्ये (डिसेंबर 2025) शासनाने सांगितले की, 2023-24 या आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षण अहवाल आणि यूसी सादर करण्यास झालेला विलंब हा प्रामुख्याने अंमलबजावणी संस्थानी केलेल्या व्यवहारांसाठी एसएनए खात्याच्या ताळमेळात झालेल्या विलंबामुळे होता, ज्यामुळे अंमलबजावणी संस्थाकडून यूसी सादर करण्यास आणखी विलंब झाला. अंमलबजावणी संस्थाकडून यूसी मिळाल्यानंतर, एसडब्ल्युएसएमने लेखे अंतिम केले आणि 2023-24 या वर्षासाठीचे एएसए आणि यूसी एनजेजेएमकडे (जुलै 2025) सादर करण्यात आले.

**निष्कर्ष**

निधी वितरणात (केंद्र/राज्य) विलंब झाला. संपूर्ण पाच वर्षांमध्ये, महाराष्ट्राला ₹ 59,740.99 कोटी देय होते, परंतु एकूण वितरित निधी (केंद्र आणि राज्य, सर्व टप्पे) केवळ ₹ 27,657.56 कोटी (46.30 *टक्के*) होता. 2019-24 या कालावधीत राज्यात जेजेएमच्या अंमलबजावणीवर एकूण खर्च ₹ 26,410.51 कोटी होता. मंजूर वाटपाच्या तुलनेत निधीचे वितरण, नियोजन सज्जता आणि अंमलबजावणी क्षमतेमध्ये लक्षणीय कमतरता दर्शवते, ज्यामुळे राज्यातील जेजेएम अंमलबजावणीच्या गतीवर प्रतिकूल परिणाम झाला आहे. लेखापरीक्षीत लेखे आणि उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्यास झालेल्या विलंबामुळे केंद्र आणि राज्य निधीचे वेळेवर वितरण आणि वापर प्रभावित झाला. अमान्य खर्चाची उदाहरणे जसे जेजेएमच्या कोणत्याही उद्दिष्टात न बसणाऱ्या असंबंधित सॉफ्टवेअरची खरेदी, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांचे बांधकाम, वीज बिलांचे पेमेंट आणि व्याजाच्या हस्तांतरणास होणारा विलंब या बाबींनी कमकुवत आर्थिक नियंत्रण आणि जेजेएमच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न केल्याचे सूचित होते.

**शिफारसी**

- *केंद्र आणि राज्य वाट्याला येणाऱ्या निधीचे वेळेवर वितरण आणि त्याचा इष्टतम वापर सुनिश्चित करण्यासाठी शासनाने निधी प्रवाह नियोजन अधिक मजबूत करावे.*

- *शासनाने न वापरलेल्या अखर्चित रकमेवरील मिळणारे व्याज एकत्रित निधीमध्ये जमा करण्याची आणि यूसी व* लेखापरीक्षीत लेखे *सादर करण्याची कालमर्यादा सुनिश्चित करावी.*
- *शासनाने सुधारित अंतर्गत नियंत्रणे आणि नियमित देखरेखीद्वारे अमान्य खर्च टाळण्यासाठी एक यंत्रणा विकसित करावी.*